(1)

Annexure-1

विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट, धम्मगिरी, इगतपुरी, जिल्हा-नाशिक या संस्थेमार्फत घेण्यात येणारे "विपश्यना"[ Vipassana ] प्रशिक्षण.

---

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- अरजा-२४९६/ ३ /सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक - २१ जुलै, १९९८.

## शासन निर्णय

उपरोक्त विषयावरील, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक - अरजा-२४९६/३/सेवा-९, दिनांक १५ मे, १९९६ मधील तरतुदींचे पुनर्विलोकन करून शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

क] विपश्यना रिसर्च इन्स्टिटयूट, धम्मगिरी, जिल्हा-नाशिक या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील प्रशिक्षण केंद्रात "विपश्यना" हे दहा दिवसांचे प्रशिक्षण सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांना घेता येईल.

ख] प्रशिक्षणासाठी प्रवेश मिळविला आहे अशा अधिकाऱ्यांना, त्यांनी मागणी केल्यास, वैद्यकीय प्रमाणपत्र सादर न करता एकावेळी कमाल १४ दिवस इतकी परिवर्तीत रजा मंजूर करता येईल.

ग] वरील प्रयोजनासाठी परिवर्तीत रजा आवश्यकतेनुसार तीन वर्षातून एकदा व संपूर्ण सेवा कालावधीमध्ये कमाल सहा वेळा याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

घ] संबंधित अधिकाऱ्याने रजेचे आवेदनपत्र प्रशिक्षणाच्या प्रवेशपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह सादर करणे तसेच, रजेवरून परत आल्यानंतर प्रशिक्षण पूर्ण केल्याचे संबंधित प्रशिक्षण केंद्राचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

ङ] शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक - अरजा-२४९६/३/सेवा-९, दिनांक १५ मे, १९९६ मधील आदेश रद्द करण्यात आले आहेत.

२. हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा [रजा] नियम, १९८१ मधील परिवर्तीत रजेसंबंधातील विद्यमान तरतुदींमध्ये या शासन निर्णयाच्या तरतुदीपुरती सुधारणा

करण्यात आली आहे असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमात यथावकाश रितसर सुधारणा करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वसन्त चौधरी

[ वसन्त चौधरी ]
शासनाचे उपसचिव, वित्त विभाग.

प्रति,

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता]-१, महाराष्ट्र, मुंबई [ ८० प्रती ]
महालेखापाल [लेखापरीक्षा]-१, महाराष्ट्र, मुंबई [ ८० प्रती ]
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता]-२, महाराष्ट्र, नागपूर [४० प्रती],
महालेखापाल [लेखापरीक्षा]-२, महाराष्ट्र, नागपूर [ ४० प्रती ]
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई [४० प्रती]
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई [ ५ प्रती ]
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे व उपमुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
x प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
x प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, यांचे कार्यालय, मुंबई.
x सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
x सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
मंत्रालयीन सर्व विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
वित्त विभागातील सर्व कार्यासने [ग्रंथपाल ५ प्रती]
निवड नस्ती, कार्यासन सेवा-९.

---

x पत्राने.

एम-५७५(१३०००+१०-७-९८)